ePaper

**अजित पवारांचं बंड कुटुंबातील सर्वांनाच आवडलेलं नाही,' युगेंद्र पवारांचं विधान**



| वर्ष - 7 । अंक - 284 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- इरफान पठाण पांड्यावर भडकला!
- सिद्धांत चतुर्वेदीला मेसेज केला
- एअर होस्टेस देश सोडतायत?
- मुख्यमंत्र्यांना भोजनाचे आमंत्रण!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 1 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## इंद्रायणी नदीमधील प्रदूषणाचा सामना करण्यासाठी

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वीत



## पाण्याचा पुर्नवापरामुळे नदीवरील अवंलबित्व कमी होण्यास होणार मदत

।पिंपरी। महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदीतील प्रदूषणावर उपाययोजना करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कुदळवाडी येथे प्रतिदिन ३ दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ईटीपी) कार्यान्वित करण्यात आला आहे.**




या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या माध्यमातून सांडपाण्यावर प्रभावीपणे प्रक्रिया होऊन नदीमध्ये मिसळणारे रासायनिक व दूषित पाणी रोखण्यास मदत होते आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषण पातळीबाबत नॅशनल रिव्हर कॉन्झर्वेशन डायरेक्टरेटने प्रकाशित केलेल्या अहवालामध्ये नदीच्या प्रदूषण पातळीबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. चिखली, कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील औद्योगिक कारखाने, गोदामे आणि अनधिकृत व्यवसायांमधून रासायनिक पाणी, तेल व ग्रीसचे होणारे विसर्जन यातून प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर कुदळवाडी जाधववाडी येथील नाल्यालगतचे अतिक्रमण सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी मोकळे करण्यात आले. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशांनुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुरु केल्या आहेत.

### प्रक्रिया केलेल्या पाण्याचा होतोय पुर्नवापर...

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या माध्यमातून प्रक्रिया केलेले पाणी व्यावसायिक, नागरिक, बांधकाम व्यावसायिकांना मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रोत्साहन देत आहे. यासाठी प्रक्रिया केलेले पाणी पाच मिनिटांत टँकरमध्ये भरण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी पाण्याचा वापर केल्याने नदीवरील अवलंबित्व कमी होणार आहे.



"इंद्रायणी नदीचे रक्षण हेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्राधान्य आहे. महापालिका सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासारख्या शाश्वत उपायांची अंमलबजावणी करून प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराला प्रोत्साहन देत आहे. यातून समाजाचे व पर्यावरणाचे कल्याण होण्याच्या दृष्टीने महापालिका प्रयत्नशील आहे.

- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.



"नदी प्रदूषणाचा सामना करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी म्हणजे एक महत्वाचा टप्पा आहे. महापालिका प्रदुषणासारख्या विषयांवर नाविन्यपूर्ण उपायांचा वापर करून पर्यावरण संवर्धनासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या सुचनेनूसार आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सक्रिय पावले उचलत आहे.

- संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता, पर्यावरण विभाग.

# शिरूर मतदारसंघाचे नुकसान झाले!

## राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवणार : आढळराव पाटील

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभा मतदारसंघाचे गेली पाच वर्ष मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. निवडून आलेला माणूस फिरत नाही. जनतेची कामे करत नाही. पण दादा तुम्ही सतत संपर्क ठेवून जनतेची कामे करत आहात. अशा परिस्थितीत चुकीच्या माणसाला निवडून देण्यापेक्षा कुठल्याही परिस्थितीत तुम्ही शिरूर मधून निवडणूक लढवा.**

असा एक मुखीआग्रह कार्यकर्त्यांनी धरल्यामुळे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला मी जर उमेदवार मान्य असेल व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रीन सिग्नल दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेस कडून लोकसभा निवडणूक लढवणार आहे.' असे मोठे वक्तव्य शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेत केले आहे. त्यामुळे आढळराव पाटील निवडणूक मैदानात उतरणारच अशी चर्चा मतदारसंघात जोरदार पणे सुरू झाली आहे.लांडेवाडी (ता. आंबेगाव) येथे शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवसेना पक्षातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. यावेळी माजी आमदार शरद सोनवणे, अरुण गिरे, रवींद्र करंजखेले सुनील बाणखेले, प्रकाश वाडेकर, संतोष डोके, सचिन बांगर, प्रवीण थोरात, सचिन काजळे, विजय आढारी, बापूसाहेब शिंदे उपस्थित होते कार्यकर्त्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेविषयी बोलताना आढळराव पाटील म्हणाले, 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बुधवारी रात्री चर्चा झाली. त्यानुसार अजून शिरूरचे जागावाटप झाले नाही. चार-पाच दिवसात याबाबतचा निर्णय होईल.



पण शिरूरच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसनेही दावा केला आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील व पक्षाचे अध्यक्ष सुनील तटकरे हे मुख्यमंत्री शिंदे यांना भेटले होते. त्यांनी सर्वाधिक आमदार व ग्रामपंचायतची संख्या आमच्याकडे असल्यामुळे ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे कदाचित ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला जाऊ शकते. किंवा शिवसेनेकडे राहू शकते.

शिवसेनेकडे राहिल्यानंतर प्रश्नच उरत नाही पण जर राष्ट्रवादीकडे गेली तर त्यांचा निर्णय असेल उमेदवारी कोणाला द्यायची. जर राष्ट्रवादीकडून विचारणा झाली किंवा महायुतीकडून विचारणा झाली तर याबाबत काय करावे .याविषयी आज कार्यकर्त्यांची मते मी जाणून घेतली. यावेळी कार्यकर्त्यांनीएकमुखाने सांगितले की मुख्यमंत्री व तुम्ही जो निर्णय घ्याल. तो आम्हाला मान्य राहील. पण निवडणूक लढवाच.शिरूरच्या उमेदवारीबाबत तुम्ही वळसे पाटील व अजित पवार यांना भेटला होता का? या प्रश्नावर उत्तर देताना आढळराव पाटील म्हणाले', विकास कामांविषयी व शिरूर लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात माझी भेट व चर्चा झालेली आहे .

खेड तालुक्याचेआमदार दिलीप मोहिते यांनी तुमच्या उमेदवारीला विरोध केला आहे. यासंदर्भात आढळराव पाटील म्हणाले, 'या मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचाराचा उमेदवार निवडून येणे गरजेचे आहे. मोहिते यांच्या समावेत यापूर्वीही संपर्क व चर्चा झालेली आहे.

### आढळराव पाटील मैदानात उतरणारच

» मी त्यांना कोणतीही हानी पोहोचवलेली नाही.पुन्हा चर्चा करून जर त्यांच्या मनात गैरसमज असतील तर ते दूर केले जातील. खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणतात, शिरूर मध्ये माझ्या विरोधात महायुतीला उमेदवारच मिळत नाही. यासंदर्भात आढळराव पाटील म्हणाले 'ते काही पण बोलतात. त्यांच्या बोलण्याला कुठलाच आधार नसतो.' दरम्यान एकंदरीत कार्यकर्त्यांचा सूर व आढळराव पाटील यांनी केलेल्या वक्तव्यानुसार शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या मैदानात आढळराव पाटील उतरणारच अशी जोरदार चर्चा शिरूर लोकसभा मतदारसंघात सुरू झाली आहे.शिरूर लोकसभा मतदारसंघाचे गेली पाच वर्ष मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# निलेश राणे यांच्यासाठी महापालिकेच्या पायघड्या

## 25 लाख भरल्यानंतर मिळकतकराची थकबाकी शून्य

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे चिरंजीव आणि माजी खासदार नीलेश राणे यांनी तीन कोटींपेक्षा जास्त मिळकतकर थकविल्यानंतरही महापालिकेने त्यांच्यासाठी पायघड्या घातल्याचे स्पष्ट झाले आहे.**

राणे यांनी ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांच्या थकबाकीपोटी २५ लाख रुपयांचा धनादेश महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडे जमा केल्यानंतर राणे यांची उर्वरित थकबाकीची रक्कम ‘शून्य’ करण्यात आली आहे. राजकीय दबावातूनच महापालिकेने थकबाकी शून्य केल्याची चर्चा सुरू झाली आहे.राणे यांच्या मालकीच्या ‘आर डेक्कन’ या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेल महापालिकेने थकीत मिळकतकर प्रकरणी लाखबंद केले होते. या कारवाईनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. राणेंच्या मालकीच्या बहुउद्देशीय व्यापारी संकुलाची पाच कोटी ६० लाख रुपये थकबाकी होती, त्यापैकी १ कोटी ४० लाख रुपये एका मजल्याची थकबाकी भरण्यात आली. उर्वरित दोन मजल्यांची तीन कोटी ७७ लाख रुपये थकबाकी भरावी, यासाठी



प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत होता. मात्र, राणे यांच्याकडून थकबाकी भरण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. त्यामुळे या इमारतीतील हॉटेल लाखबंद करण्यात आले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ठाकरे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून आंदोलनही करण्यात आले होते. राणे यांच्याकडून थकबाकीची रक्कम वसूल करावी, अशी मागणीही करण्यात आली होती. दरम्यान, ३ कोटी ७७ लाख रुपयांची थकबाकी असताना राणे यांनी २५ लाख रुपयांचा धनादेश महापालिकेकडे जमा केला. त्यानंतर थकबाकीची रक्कम ‘शून्य’ करण्यात आली आहे. उर्वरित मालमत्तेच्या करासंदर्भात वाद सुरू असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.राणे यांनी थकीत रक्कम पूर्ण न भरता त्यांचा कर माफ करण्यात आल्यानंतर ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. राणे यांना दिलेली सवलत सर्व थकबाकीदारांना द्यावी, अशी मागणी शहरप्रमुख संजय मोरे यांनी केली आहे.

### 60 लाख रुपये थकबाकी होती

» राणे यांनी ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांच्या थकबाकीपोटी २५ लाख रुपयांचा धनादेश महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडे जमा केल्यानंतर राणे यांची उर्वरित थकबाकीची रक्कम ‘शून्य’ करण्यात आली आहे. राजकीय दबावातूनच महापालिकेने थकबाकी शून्य केल्याची चर्चा सुरू झाली आहे.राणे यांच्या मालकीच्या ‘आर डेक्कन’ या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेल महापालिकेने थकीत मिळकतकर प्रकरणी लाखबंद केले होते. या कारवाईनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. राणेंच्या मालकीच्या बहुउद्देशीय व्यापारी संकुलाची पाच कोटी ६० लाख रुपये थकबाकी होती, त्यापैकी १ कोटी ४० लाख रुपये एका मजल्याची थकबाकी भरण्यात आली.

## महायुती सरकारने प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांच्या

# तोंडाला पाने पुसली : संजोग वाघेरे-पाटील

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासामध्ये योगदान देणाऱ्या शहरातील भूमिपुत्रांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम राज्यातील महायुती सरकारने केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये प्राधिकरण बाधितांना साडेबारा टक्के परतावा देण्याची घोषणा केली. त्यानंतर महायुतीच्या स्थानिक नेत्यांनी मिठाई वाटली. पण, अद्याप हा प्रश्न सुटलेला नाही, अशी घणाघाती टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक व माजी महापौर संजोग वाघेरे यांनी केली आहे.**



हिवाळी अधिवेशनात घोषणा केली पण, अंमलबजावणीसाठी 'तारिख पे तारीख'

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने १९७२ ते १९८३ या कालवाधीत संपादित केलेल्या शेतक-यांना ६.२ टक्के परतावा आणि २ चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याचा प्रश्न सोडवण्याबाबत राज्य सरकारने हिवाळी अधिवेशन-२०२२ मध्ये घोषणा केली होती. त्याबाबतचा प्रस्ताव राज्य कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. मात्र, या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. या संदर्भात बोलताना संजोग वाघेरे म्हणाले की, राज्यात व केंद्रात महायुतीची निर्विवाद सत्ता आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री धडाकेबाज निर्णय घेण्यात तरबेज आहेत. असे असतानाही पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांशी संबंधित गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यात महायुती सरकार अपयशी ठरले आहे. त्यामुळे भूमिपुत्रांमध्ये नाराजीचा सूर आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी प्राधिकरणाने सन १९७२ पासून सन १९८३ पर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत. १९८४ नंतर दुसरा टप्पा संपादित झाला. १९८४ नंतरच्या बाधित शेतक-यांना मोबादला मिळाला. पण, १९७२ ते १९८३ दरम्यान जमिनी संपादित झालेल्या १०६ बाधित शेतक-यांना कुठलाही मोबादला मिळालेला नाही. आजच्या घडीला चौथी पिढी परताव्यासाठी संघर्ष करीत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर आश्वासनांचे गाजर दाखवणारे स्थानिक नेते भूमिपुत्रांना न्याय मिळवून देण्यास अपयशी ठरले आहेत, असा घणाघातही संजोग वाघेरे यांनी केला आहे.

> 'प्राधिकरण बाधितांना परतावा मिळणार", अशी घोषणा महायुती सरकारच्या उदासीनतेमुळे केवळ घोषणाच राहीली आहे. अपयश झाकण्यासाठी विद्यमान खासदार भूमिपुत्रांना आशा दाखवण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेल्या १० वर्षांत राज्यात आणि केंद्रातील सत्तेत असताना हा प्रश्न का सुटला नाही? असा भूमिपुत्रांचा सवाल आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा भूमिपुत्रांना आश्वासने दिली जात आहेत. प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांच्या चौथ्या पिढीलाही न्यायायासाठी संघर्ष करावा लागत आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांमध्ये ताळमेळ नाही. त्यामुळे हा प्रश्न लांबणीवर पडला आहे. शहरातील भूमिपुत्र राजकीय परिस्थितीचे शिकार ठरले आहेत, ही बाब दुर्दैवी आहे.
>
> – संजोग वाघेरे-पाटील, संघटक, शिवसेना (उबाठा), मावळ.

---

## शालेय मुलांना साहित्य भेट: वाढदिवस विधायक पद्धतीने केला साजरा

# शेखर काटे यांनी जपली 'सामाजिक बांधिलकी'

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेखर काटे यांनी यावर्षी वाढदिवस अनावश्यक खर्च न करता विधायक पद्धतीने साजरा केला. शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्य भेट देण्यात आले. या उपक्रमाचे सामाजिक क्षेत्रात कौतूक होत आहे.**

दापोडी येथील जनता शिक्षण संस्थेला माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्याहस्ते एलईडी टीव्ही, लॅपटॉप, झेरॉक्स मशीन सपूर्द करण्यात आले. यावेळी जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश जगताप, उपाध्यक्ष रमेश कार्ले, कार्याध्यक्ष महेशकुमार आगम, जनरल सेक्रेटरी सुभाष जावळे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत तापकीर, काळुराम कवितके, निखील घाडगे तसेच संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेखर काटे म्हणाले की, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना अनेकदा समाजाच्या सुख-दु:खात सहभागी होण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने यावर्षी आम्ही वंचितांसोबत दिवाळी साजरी केली होती. तळागाळातील लोकांचा विचार करुन समाजाचे आपण काही देणे लागतो... या भावनेतून आम्ही कार्यरत आहोत.

### कुटुंबाकडून मिळासा सामजिक वारसा...

**शेखर काटे म्हणाले की, राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबात जन्म घेतला. त्यामुळे सामाजिक दायित्वाचा वारसा आपोआप खांद्यावर आला. प्रत्येक वर्षी होणारा वाढदिवस आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी या संस्मरणीय असतातच. पण यावेळी आणखी विधायक पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचा संकल्प होता. कुटुंबाकडून मिळालेल्या सामाजिक बांधिलकीच्या संस्कारातून अनावश्यक खर्च न करता वाढदिवस साजरा केल्याचे समाधान वाटते.**





## भूमिका

# संसद कामकाजाचा आक्रसलेला अवकाश

**संवादाचे आक्रसणारे अवकाश, स्थायी समितीचे घटणारे महत्त्व हे सतराव्या लोकसभेच्या कामकाजाचे चित्र. अर्थात कोविडच्या महासाथीसह अडथळ्यांचाही सामना करावा लागला. तथापि, संसदीय कार्याकडे दुर्लक्ष झाल्यास राहील ती चेतनाविरहीत लोकशाही असेल, हेही लक्षात घ्यावे.**

सन २०१९च्या मे महिन्यात बहुपक्षीय निवडणुकांच्या माध्यमातून स्थापन झालेल्या सतराव्या लोकसभेचा कार्यकाळ पूर्णत्वास येऊ घातला आहे. स्वातंत्र्यानंतर कार्यकाळ पूर्ण करणारी ही बारावी लोकसभा. तर १९९९ पासून ते २०२४ पर्यंत, सलग चार वेळा लोकसभा पूर्ण पाच वर्षांसाठी अस्तित्वात असण्याचा नवा विक्रम होऊ घातला आहे. यापूर्वी, पहिल्या तीन लोकसभांनी सलगपणे, म्हणजे १९५२ ते १९६७ पर्यंत कार्यकाळ सहजतेने पूर्ण केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा पाच वर्षांचा सलग दुसरा कार्यकाळ पूर्णत्वास येऊ घातला आहे. सतरा व्या लोकसभेच्या एकूण पंधरा अधिवेशनांमध्ये २७४ बैठका झाल्या आणि दर वर्षी सरासरी ५५ दिवस कामकाज झाले. कार्यकाळ पूर्ण केलेल्या लोकसभांमध्ये हा नीचांक आहे. कोविडच्या काळात संसदेची लघु-अधिवेशने झाली हे यामागील एक कारण असले, तरी इतर काळातील सत्रांमध्ये



परिस्थिती फार वेगळी नव्हती. ही बाब केवळ सतराव्या लोकसभेलाच नव्हे तर १९८०पासून सर्वच लोकसभांना लागू होते.या तुलनेत, पहिल्या ते सहाव्या लोकसभांमध्ये दरवर्षी सरासरी शंभरहून अधिक दिवस कामकाज चालल्याची नोंद असल्याचे 'पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च'च्या अहवालात म्ङटले आहे. नमूद केले आहे. पहिल्या लोकसभेचा १३५ दिवसांच्या वार्षिक सरासरी कामकाजाचा उच्चांक आहे. सतराव्या आणि सोळाव्या लोकसभेने अनुक्रमे २२१ व १८० विधेयके पारित केली.

त्या तुलनेत, मनमोहन सिंग सरकारच्या दहा वर्षांच्या काळात ४५३ विधेयके संसदेने मंजूर केली होती; तर अटलबिहारी वाजपेयींना पंतप्रधान करणाऱ्या तेराव्या लोकसभेने ३०२ विधेयके पारित केली होती. विधेयकांवरील चर्चेचा वेळ व विधेयके पारित करण्याची प्रक्रिया हे वर्षानुगणिक अधिकाधिक चिंतेचे विषय झाले आहेत. सतराव्या लोकसभेत ३५% विधेयके एका तासापेक्षा कमी चर्चेत मंजूर झाली.मंजूर विधेयकांपैकी आणखी ३५% विधेयकांवर तीन तासांपेक्षा कमी काळ चर्चा झाली; तर केवळ ३०% विधेयकांवर तीन तासांपेक्षा जास्त काळ चर्चा झाली. सोळाव्या आणि पंधराव्या लोकसभेचे आकडे या पेक्षा वेगळे नाहीत. मात्र, डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातील संयुक्त पुरोगामी सरकार आणि मोदी सरकार यांच्या संसदीय कार्यपद्धतीतील महत्त्वाची तफावत स्थायी समित्यांकडे पाठवण्यात येणाऱ्या विधेयकाबाबत बघावयास मिळते. संसदीय आकडेवारीतून असे दिसते की, सतराव्या लोकसभेत केवळ १६% विधेयके स्थायी समित्यांकडे पाठवण्यात आली, तर सोळाव्या लोकसभेत २८% विधेयके स्थायी समित्यांकडे पाठवण्यात आली होती. डॉ. मनमोहन सिंग सरकारने, चौदाव्या व पंधराव्या लोकसभेच्या कार्यकाळात अनुक्रमे ६०% आणि ७१% विधेयके स्थायी समित्यांकडे पाठवली होती.संसदेच्या पटलावर विधेयकांवर सविस्तर चर्चा न होण्याचे एक कारण असे असते की, स्थायी समित्यांमध्ये (जिथे सर्वपक्षीय खासदार असतात), विधेयकांवर साधकबाधक चर्चा झालेली असते. मात्र, विधेयके स्थायी समितीकडे पाठवण्याच्या विरोधकांच्या मागण्यांना दाद द्यायची नाही, आणि सत्ताधारी व विरोधक अशा दोघांनीही संसदेत विधेयकांवर चर्चा करायची नाही हे कायदेनिर्मितीत प्रत्यक्षरित्या बाबूशाहीला बळकट करते. याशिवाय, यामुळे बड्या देशी-विदेशी उद्योगपतींचा विविध मंत्रालयातील प्रभाव व दबावतंत्राची चलती होते.सतराव्या लोकसभेच्या कार्यकाळात मोदी सरकारने तिहेरी तलाकबंदी, जम्मू व काश्मीर पुनर्गठन, नागरिकत्व (सुधारणा), तीन कामगार संहिता, डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण, नवी भारतीय न्यायसंहिता आणि पुढील जनगणनेनंतर महिलांना संसदेत ३३% आरक्षण ही महत्त्वाची विधेयके संमत केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे सरकारला मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीची प्रक्रिया निर्धारित करणारे विधेयकही संसदेत मांडावे लागले, जे पारित झाले.

## संपादकीय »

### अधिक की व्यापक?

***नाइट फ्रँक'च्या ताज्या अहवालानुसार पुढच्या चार वर्षांत महाधनिकांची संख्या वाढण्याचा वेग जगात सर्वाधिक असणार आहे, तो भारतात...***

कोणत्याही देशाची श्रीमंती त्या देशात अब्जाधीश किती राहतात यावर मोजणे चांगले की त्या देशातील सर्वसामान्य नागरिकांचे सरासरी उत्पन्न किती, त्यांचे राहणीमान कसे यावर मोजणे योग्य, हा प्रश्न नव्याने पडण्याचे कारण म्हणजे 'नाइट फ्रँक' या जागतिक गृह-वित्त सल्लागार संस्थेचा ताजा अहवाल. नाइट फ्रँक ही सव्वाशे वर्षांहूनही अधिक वर्षांपूर्वी लंडनस्थित संस्था असून स्थावर आदी मालमत्तेबाबतचे या संस्थेचे अहवाल जागतिक पातळीवर गांभीर्याने घेतले जातात. या संस्थेचा 'वेल्थ रिपोर्ट २०२४' नुकताच प्रकाशित झाला. जगभरातील जवळपास सर्व देशांतील नागरिकांची वित्तस्थिती, त्या त्या देशांतील श्रीमंत, महाश्रीमंत, त्यांची जीवनशैली, त्यांचे गुंतवणुकीचे पर्याय, गृहमालमत्ता क्षेत्रातील बदल अशा अनेकांगांनी 'नाइट फ्रँक'च्या या अहवालात विचार केला जातो.

शेतकऱ्यांच्या पुन्हा सुरू झालेल्या आंदोलनाने हमीदराच्या अर्थात किमान आधारभूत किंमतीबाबतच्या राष्ट्रव्यापी चर्चेत मोठे बदल घडवून आणले आहेत. १३ महिने दिल्लीच्या वेशीवर ठाण मांडले, त्या ऐतिहासिक आंदोलनातून 'हमीदर हवा कशाला' असा प्रश्न करणाऱ्यांनाही 'हमीदर का हवा' हे सांगण्यापर्यंत पहिले पाऊल टाकले.

# टीकाकारांना शेतकऱ्यांइतकी समज कधी येणार?

तर सध्याच्या आंदोलनाने 'का हवा'वरून आता 'हमीदर कसा हवा' हेही लोकांपर्यंत पोहोचवण्यात यश मिळवले आहे... पण यापुढला टप्पा मात्र 'हमीदर कधी?' हा आहे आणि आम्ही सारेजण या टप्प्याची वाट पाहत आहोत.फार पूर्वी नाही, २०१६ आणि २०१७ मध्ये 'जय किसान आंदोलना'तर्फे विविध राज्यांतल्या शेतमाल बाजारांमध्ये 'हमीदर यात्रा' काढण्यात आली होती. या साऱ्या 'अधिकृत' कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये, अधिकृत हमीदरापेक्षा इतका कमी दर शेतकऱ्यांना मिळत असलेला पाहून कोणीही हबकून जाईल... मग शेतकऱ्याच्या गावात-खेड्यात येऊन तिथून व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या शेतमालाचा दर आणखी किती कमी असेल याची कल्पना करा. हमीदराबद्दल अनेक शेतकऱ्यांना पुरेशी माहितीदेखील नव्हती... ज्या भागांमध्ये सरकारने हमीभावाने खरेदीची केंद्रे उघडली आहेत तिथेच आणि त्याच पिकापुरता



हमीदर शेतकऱ्यांना माहीत होता. या 'हमीदर यात्रे'ने, गावोगावच्या घाऊक बाजारांत शेतकरी कसे नाडले जातात याचे दशावतार पाहायला मिळाले. दररोज ज्या-ज्या पिकांचे बाजारात प्रत्यक्ष मिळणारे दर आम्हाला यात्रेतून माहीत होत, ते आणि हमीदर यांची समोरासमोर आकडेवारी आम्ही 'किसान की लूट' या शीर्षकाखाली दररोज प्रसिद्ध करू लागलो. अर्थातच, काही थोडे पत्रकार वगळता एकंदर 'मीडिया'ने या साऱ्याकडे दुर्लक्षच केले. मग आम्हीच वर्तमानपत्रांच्या आणि चित्रवाणी वृत्तवाहिन्यांच्या कार्यालयांत गेलो... तर तिथेही 'हमीदर? म्हणजे काय? असतो असा दर?' असे प्रश्न आम्हाला ऐकावे लागले... पॅकबंद उत्पादनांवरली छापील किंमत अर्थात इंग्रजीतली 'एमआरपी' (मॅग्झिमम रीटेल प्राइस) या पत्रकारांना माहीत होती, पण अनेकांना हमीदर शेतमालाची 'एमएसपी' (मिनिमम सपोर्ट प्राइस) ठरवली जाते, ती २० हून अधिक पिकांसाठी (तेव्हा) मिळते, हे काहीही माहीतच नव्हते. सरकारच हमीदर ठरवते आणि त्याचे इतके सरसकट उल्लंघन होत असूनसुद्धा सरकार कधीही लक्ष देत नाही, हे गंभीर आहे इतपत बोध मात्र यापैकी बऱ्याच जणांना झाला.सन २०२०-२१ चे किसान आंदोलन हा यापुढला टप्पा होता. शेतकरीविरोधी ठरणारे तीन 'काळे कायदे' मागे घ्या, या प्रमुख मागणीचाच बोलबाला त्या आंदोलनातून जास्त झाला असला तरी त्याबरोबरीने हमीदराची मागणीसुद्धा या आंदोलनाने केलेली होती. यापैकी फक्त कायद्यांच्या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अखेर पाऊल मागे घेतले, पण त्यानंतरही महिनाभर शेतकऱ्यांनी तिथेच ठाण मांडले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवारांचे मुख्यमंत्र्यांना भोजनाचे आमंत्रण!

## अतिथी निवासात चहापान; त्यांच्या घरी जेवणासाठी आमंत्रण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार यांनी एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून हे जेवणाचे आमंत्रण दिले आहे. बारामतीत आयोजित करण्यात आलेला हा महारोजगार मेळावा शरद पवार संस्थापक सदस्य असलेल्या बारामतीतील विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी येथे होत आहे.**



शरद पवार या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष या नात्याने शरद पवारांनी तिन्ही मान्यवरांना बारामतीतील अतिथी निवासात चहापानासाठी तसेच गोविंदबाग या त्यांच्या घरी जेवणासाठी आमंत्रित केले आहे. शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले असून खाली प्रतिलिपीच्या स्वरुपात अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांचाही उल्लेख केला आहे. ‘आपण २ मार्च रोजी बारामती येथे शासकीय दौऱ्यानिमित्त येत असल्याचे मला समजले. सदस शासकीय कार्यक्रमाप्रसंगी संसद सदस्य म्हणून मला आणि सुप्रिया सुळे यांना उपस्थित राहायला आवडेल. या कार्यक्रमाचे आयोजन मी संस्थापक सदस्य असलेल्या विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती येथील मैदानात आयोजित करण्यात येत असल्याने संस्थेचा अध्यक्ष या नात्याने मी आपले संस्थेच्या प्रांगणात यथोचित स्वागत करू इच्छितो. करिता विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती येथील अतिथी निवासात चहापानासाठी आपणांस निमंत्रित करतो,’ असे पवार या पत्रात म्हणाले आहेत.‘आपण मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्यानंतर बारामती शहरी प्रथमच येत आहात, याचा मला मनोमन आनंद आहे. बारामती येथील गोविंदबाग या माझ्या निवासस्थानी अतिथ्य भोजनाचा आस्वाद घ्यावा असे मी आपणांस दुरध्वनीवरून यापूर्वीच निमंत्रण दिले आहे. कृपया नमो महारोजगार मेळाव्यानंतर आपण मंत्रिमंडळातील इतर सहकाऱ्यांसह या निमंत्रणाचाही विचार करावा. दोन्ही सस्नेह निमंत्रणाचा आपण स्वीकार कराल, अशी अपेक्षा व्यक्त करतो,’ असेही शरद पवार आपल्या पत्राच्या माध्यमातून म्हणाले आहेत.दरम्यान, या पत्रानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शरद पवार यांच्या घरी भोजनासाठी जाणार का? असा प्रश्न विचारला जात आहे. तर दुसरीकडे स्वतः शरद पवार यांनी राजशिष्टाचार विभागाला कोणत्याही शासकीय कार्यक्रमात माझे नाव टाकू नये, अशा स्पष्ट सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक शासकीय कार्यक्रमावेळी पवार यांचे नाव टाकण्यात येत नाही. त्यामुळे या कार्यक्रमातही नाव टाकण्यात आले नाही. मात्र आता पवार यांचे नाव निमंत्रण पत्रिकेत टाकण्यात येईल आणि नवी निमंत्रण पत्रिका तयार करण्यात येईल, असे स्पष्टीकरण प्रशासनाकडून देण्यात आले आहे.बारामतीमध्ये सरकारतर्फे ‘नमो महारोजगार मेळावा’ आयोजित करण्यात आला आहे. २ आणि ३ मार्च रोजी होणाऱ्या या मेळाव्यासाठी स्थानिक खासदार सुप्रिया सुळे आणि बारामतीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना निमंत्रण मिळाले नसल्याची बातमी आज दिवसभर सुरू होती. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांना त्यांच्या पुणे कार्यालयात सदर निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आली. मात्र शरद पवार यांना अद्यापही निमंत्रण दिलेले नाही. सुप्रिया सुळे यांनी निमंत्रण पत्रिकेचा फोटो सोशल मीडियावर टाकला आहे. त्यामध्ये त्यांचे नावही समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचे दिसले. शरद पवार आणि बारामती असे समीकरणच आजवर दिसत होते. देशाचे अनेक माजी राष्ट्रपती, माजी पंतप्रधान हे बारामती येथे येऊन गेले आहेत. कोणताही शासकीय कार्यक्रम असला तरी शरद पवार त्याचा भाग असतात. मात्र पहिल्यांदाच त्यांना एखाद्या शासकीय कार्यक्रमातून वगळण्यात आले आहे.शरद पवार ज्या विद्या प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष आहेत, त्याच संस्थेच्या मैदानात सदर मेळावा संपन्न होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही शरद पवार यांना निमंत्रण दिलेले नाही, अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी विधान भवनात माध्यमांशी बोलताना दिली. तर निमंत्रण मिळण्यापूर्वी सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या, मला निमंत्रण मिळाले नाही तरी मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचं स्वागत करायला उपस्थित राहणार.

### विद्या प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष

» त्यामध्ये त्यांचे नावही समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचे दिसले. शरद पवार आणि बारामती असे समीकरणच आजवर दिसत होते. देशाचे अनेक माजी राष्ट्रपती, माजी पंतप्रधान हे बारामती येथे येऊन गेले आहेत. कोणताही शासकीय कार्यक्रम असला तरी शरद पवार त्याचा भाग असतात. मात्र पहिल्यांदाच त्यांना एखाद्या शासकीय कार्यक्रमातून वगळण्यात आले आहे. शरद पवार ज्या विद्या प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष आहेत, त्याच संस्थेच्या मैदानात सदर मेळावा संपन्न होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही शरद पवार यांना निमंत्रण दिलेले नाही, अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी विधान भवनात माध्यमांशी बोलताना दिली.

# तुलना कुणाशी करायची, याचं भान ठेवा : जयंत पाटील

## सत्तेशिवाय विकास नाही; विकासाला तत्त्वांची झालर पाहीजे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी एक खुले पत्र प्रसिद्ध करून आपण राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यापासून फारकत घेऊन भाजपाला पाठिंबा देण्याचा निर्णय का घेतला? याचे स्पष्टीकरण दिले होते.**



या पत्रात त्यांनी पंतप्रधान मोदी आणि शाह यांच्या कार्यप्रणालीशी आपली कार्यप्रणाली मिळतीजुळती असल्याचे म्हटले होते. त्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी टोला लगावला आहे. इकडे असताना काहीही चालत होते, तिकडे असे चालत नाही, तुलना करताना भान ठेवा, असा खोचक सल्ला जयंत पाटील यांनी अजित पवार यांना विधानसभेत बोलताना दिला.जयंत पाटील विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेत म्हणाले, “अजित पवारांनी काही दिवसांपूर्वी पत्र लिहिले. सत्तेमध्ये असल्याशिवाय विकास होत नाही, असे त्यात ते म्हटले. हे खरंय, सत्ता असल्याशिवाय विकास करता येत नाही. पण विकासाला तत्त्वांची झालर असली पाहिजे. विकासाला काही धोरण असलं पाहिजे. पण त्या पत्रात ते म्हणाले, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या सारखी माझी कामाची शैली आहे. आमचे त्याबाबत दुमत नाही. पण दुसऱ्यांची (भाजपाचे) हरकत येऊ शकते. आपली तुलना कुणाशी करायची? याचं भान तिकडं गेल्यावर ठेवण्याची गरज आहे.”“देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली जो विकास होतो आहे, तो मला महत्वाचा वाटला, कणखर नेतृत्व व योग्य निर्णयप्रक्रीया हे त्यांचे गुण मला भावले.

### त्यांची कार्यप्रणाली मिळतीजुळती

» माझी आणि त्यांची कार्यप्रणाली मिळतीजुळती आहे, कामावर आमचे जास्त प्रेम आहे, त्यांच्यासमवेत माझ्या भविष्यातील विकासाच्या ज्या योजना आहेत, त्या अधिक प्रभावीपणे प्रत्यक्षात उतरविणे शक्य होईल, असे मला वाटल्याने मी त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला”, अशी भूमिका अजित पवार यांनी पत्रात मांडली होती.

# पाकिस्तानी एअर होस्टेस देश सोडतायत?

## महागाई, राजकीय अस्थिरता, कर्जबाजारीपणाला कंटाळले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानमधील विमानसेवा देणारी शासकीय कंपनी पाकिस्तान आंतरराष्ट्रीय एअरलाईन्सस‌ध्या एका वेगळ्याच अडचणीचा सामना करत आहे. पाकिस्तान एअरलाईन्सचे क्रू सदस्य कॅनडामध्ये गेल्यानंतर बेपत्ता होत आहेत. २०१९ सालापासून असे अनेक सदस्य कॅनडामध्ये गेल्यानंतर बेपत्ता झाले आहेत, अशी माहिती सिम्पल फ्लाईंग या संकेतस्थळाने दिली.**



पाकिस्तानमधील डॉन (DAWN) या वृत्तपत्राने दिलेल्या बातमीनुसार, कॅनडाच्या टोरोंटोमध्ये क्रू सदस्य थांबलेल्या एका हॉटेलच्या खोलीत 'धन्यवाद, पीआयए' असा संदेश लिहिलेली चिठ्ठी आढळली. चौकशीअंती समजले की, मरियम रझा नावाच्या एअर होस्टेसने ही चिठ्ठी लिहून पळ काढला. इस्लामाबादहून निघालेले विमान २६ फेब्रुवारी रोजी टोरोंटोमध्ये पोहोचले. दुसऱ्याच दिवशी कराचीला परतीचा प्रवास होता. मात्र, मरियम रझा कामावर रुजू झाली नाही. त्यानंतर केलेल्या चौकशीत हा प्रकार उघडकीस आला. विमानतळ यंत्रणेने मरियमच्या खोलीची तपासणी केली असता, तिचा एअर होस्टेस गणवेष आणि त्यासोबत चिठ्ठी आढळून आली.पाकिस्तानच्या एअरलाईन्सचा वापर करून दुसऱ्या देशात पळ काढणारी मरियम ही पहिली कर्मचारी नाही. गेल्या अनेक वर्षांपासून जी पद्धत सुरू झालीये, त्याचीच पुनरावृत्ती मरियमच्या प्रकरणातून दिसून आली. जानेवारी २०२४ मध्येच पीआयएचे फ्लाईट अटेन्डंट फैज मुख्तार हे कॅनडात बेपत्ता झाले होते. पीआयएचे प्रवक्ते अब्दुल्हा हफिज खान यांनी सांगितले की, कॅनडात गेल्यानंतर फैज यांनी दुसऱ्या दिवशी परतीच्या विमानात रुजू व्हायला हवे होते, मात्र तसे झाले नाही.मरियम आणि फैज यांच्या आधीही अनेक क्रू सदस्यांनी कॅनडामध्ये आश्रय घेतला आहे, ज्यामुळे पीआयए अडचणीत आली आहे. यामुळे एअरलाईन्सचे आर्थिक नुकसान तर होत आहेच, त्याशिवाय विश्वासार्हतेलाही तडा गेला आहे. २०२४ च्या दुसऱ्याच महिन्यात दुसरी घटना घडल्यामुळे आता याची जगभर चर्चा होत आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांच्या पत्नी जॅकलीन केनेडी यांनी १९६२ मध्ये पाकिस्तान आंतरराष्ट्रीय एअरलाईन्सचे कौतुक केले होते. 'ग्रेट पिपल टू फ्लाय विथ', असे उद्गार त्यांनी काढले होते. त्यानंतर पीआयएने या वाक्याला आपले घोषवाक्य बनविले होते.१९६० च्या दशकात पाकिस्तानची जी परिस्थिती होती, ती आज राहिलेली नाही, असे चित्र सध्या दिसत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या भरमसाठ कर्जाचा बोजा पाकिस्तानवर आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संस्थांकडून पाकिस्तानने मदत घेतली आहे. तसेच २०२३ मध्ये बौद्धिक संपदा असलेल्या अनेक मान्यवरांनी पाकिस्तानला राम राम ठोकून इतर देशात स्थायिक होण्याचा पर्याय निवडला. पाकिस्तानमध्ये आपले भविष्य अंधकारमय आहे, अशी भावना मनात घर करत असल्यामुळे कौशल्य असलेले अनेक कर्मचारी देशाच्या सीमा ओलांडून इतर देशात आश्रय शोधत आहेत. २०१९ पासून पाकिस्तान एअरलाईन्सचे कर्मचारी परदेशात गेल्यानंतर बेपत्ता होत आहेत. मीडिया लाईन वृत्त संकेतस्थळाने सांगितले की, पीआयए क्रू सदस्य कॅनडा आणि इतर देशात गेल्यानंतर तिथे आश्रय मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. २०१९ पासून ही पद्धत सुरू झाल्याचे दिसते.मागच्या वर्षी पीआयएचे सात सदस्य कॅनडाच्या भूमीत उतरल्यानंतर परागंदा झाले आहेत. पीआयएचे प्रवक्ते अब्दुल्हा हाफिज खान यांनी दिलेल्या माहितीनुसार डिसेंबर २०२३ मध्ये दोन क्रू सदस्य लाहोरच्या अल्लामा इक्बाल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून टोरोंटोमध्ये गेले आणि तिथून ते परतीच्या विमानावर रुजू झाले नाहीत. त्यामुळे क्रू सदस्यांविनाच विमान पुन्हा इस्लामाबादकडे आणण्यात आले. नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२३ मध्ये अयाझ कुरेशी, खालिद अफ्रिदी आणि फिदा हुसैन शाह हे कॅनडात गेल्यानंतर परागंदा झाले.प्रवक्ते अब्दुल्हा फाफिज खान यांनी अरब न्यूजशी नोव्हेंबर २०२३ मध्ये बोलताना म्हटले की, कॅनडा सरकारचे उदारमतवादी धोरण यासाठी जबाबदार आहे. मागच्या काही वर्षांत प्रत्येक वर्षी तीन ते चार क्रू सदस्य टोरंटोमध्ये गेल्यानंतर परागंदा होत आहेत. पीआयएकडून कॅनडाच्या धोरणांवर टीका होत असली तरी तज्ज्ञ मात्र स्वतःच्या देशातील उदासीनतेकडे बोट दाखवितात. क्रू सदस्यांना मिळणारे कमी वेतन आणि एअरलाईन्सचे अधांतरी भवितव्य यामुळे क्रू सदस्यांना स्वतःच्या भविष्याची चिंता वाटते. त्यामुळे कॅनडामध्ये गेल्यानंतर मायदेशी परतण्याऐवजी ते तिथेच राहणे पसंत करत आहेत. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या बातमीनुसार, पाकिस्तानमध्ये सार्वत्रिक निवडणुका होण्याच्या दोन दिवस आधी पाकिस्तानच्या काळजीवाहू सरकारने पीआयएचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेतला.

### 2023 मध्ये सात क्रू सदस्य परागंदा

आर्थिक चणचण सहन करणाऱ्या एअरलाईन्सला पुन्हा संजीवनी देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे बोलले गेले. समा टीव्हीने दिलेल्या माहितीनुसार मागच्या पाच वर्षांपासून वर्षाला सरासरी पाच क्रू सदस्य कॅनडामध्ये आश्रय घेणे पसंत करत आहेत. पीआयए प्रवक्ते खान यांनी सांगितले की, कॅनडामध्ये आश्रय घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना आम्ही तात्काळ बडतर्फ करून त्यांना दंड ठोठावला जातो. तसेच सेवेदरम्यानचे त्यांचे सर्व लाभ रद्द केले जातात.२०१८ साली माहिरा नावाच्या क्रू सदस्याने पहिल्यांदा पाकिस्तानमध्ये आश्रय घेतला होता. त्यानंतर तिने इतर क्रू सदस्यांना कायदेशीर मदत देऊन आश्रय मिळवून देण्यात मदत केली. प्रवक्ते खान यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षात जे क्रू सदस्य कॅनडात आश्रय घेऊन रहात आहेत, ते आता नव्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करतात, ज्यामुळे नव्या लोकांनाही आश्रय मिळू शकेल. पाकिस्तानमध्ये गेल्या काही काळापासून अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

---

# यवतमाळमधील पीएम मोदींच्या सभेचा खर्च 12 कोटी पार!

## आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किती पैशांचा केला जाईल चुराडा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पीएम मोदी यांची बुधवारी (28 फेब्रुवारी) यवतमाळमध्ये सभा पार पडली. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराचे रणशिंग या निवडणुकीतून फुंकले गेले. या सभेसाठी शिंदे फडणवीस सरकारकडून जबरदस्त तयार करण्यात आली होती. दरम्यान, समोर आलेल्या माहितीनुसार यवतमाळच्या सभेसाठी करण्यात आलेल्या खर्चाचा आकडा पाहून सुद्धा भूवया उंचावल्या गेल्या आहेत.**

पीएम मोदींच्या सभेसाठी भव्य मंडप तसेच इतर व्यवस्था करण्यासाठी करण्यात आलेला खर्च तब्बल 12 कोटी 73 लाख 33 हजार 500 रुपयांच्या घरात आहे. एका सभेचा हा इतका अवाढव्य खर्च असेल, तर आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किती पैशांचा चुराडा केला जाईल, याचा विचार न केलेला बरा असे म्हणायची वेळ आली आहे. दुसरीकडे गेल्या काही दिवसांपासून शिंदे फडणवीस सरकारकडून 'शासन आपल्या जारी' हा कार्यक्रम प्रत्येक जिल्ह्यामध्ये राबवला



जात आहे. यासाठी सुद्धा कोट्यवधींच्या घरात खर्च आहे. विरोधकांकडून सरकारकडून करण्यात येणाऱ्या जाहिरातींवरील खर्चावही सातत्याने टीका होत आहे. दरम्यान, मोदी यांनी यवतमाळमध्ये झालेल्या सभेत अब की बार 400 पारचा नारा देत नागामी लोकसभा निवडणुकीसाठी बिगुल फुंकला. यावेळी त्यांच्या हस्ते विविध विकासकामाचे लोकार्पण तसेच विविध योजनांचे निधी वितरण पार पडले. नागपूर रोडवरील डोर्लीमध्ये मोदी यांच्या हस्ते वर्धा कळंब ब्रॉडगेज रेल्वे लाईन आणि प्रवासी रेल्वेसह विविध योजनांचा श्री गणेशा करण्यात आला.

### किसान सन्मान निधीचा हप्ता वितरित

नमो शेतकरी महासन्मान योजना दुसरा व तिसरा हप्ता आणि पीएम किसान सन्मान निधीचा सोळावा हप्ता वितरित करण्यात आला. यावेळी बोलताना मोदींनी काँग्रेसवर टीका केली. काँग्रेस आघाडीच्या सरकारमध्ये कृषीमंत्री महाराष्ट्राचे असूनही केंद्रातून निघालेल्या एक रुपयांपैकी केवळ 15 पैसे लाभार्थ्यांनी पोहोचेले. म्हणजे मी आता जे 21 हजार कोटी लाभार्थ्यांचे खात्यामध्ये पोहोचवली त्यातले 18000 कोटी लुटले गेले असते अशी टीका त्यांनी केली. तत्पूर्वी, मोदी यांचे व्यासपीठावर सहा वाजून दोन मिनिटांनी आगमन झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंजारा समाजाची पगडी तसेच स्वयंसहाय्यता गटांनी बनवलेल्या वस्तू भेट देऊन त्यांचे स्वागत केले.

# दीपिका -रणवीर सिंहने दिली गुडन्यूज

अभिनेत्री दीपिका पदुकोण व रणवीर सिंह बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. ऑनस्क्रीनबरोबरच ऑफस्क्रीन केमिस्ट्रीमुळे दोघे नेहमीच चर्चेत असतात. आदर्श जोडी म्हणून दोघांकडे बघितले जाते. दीपिका व रणवीर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. आता दीपिकाने तिच्या चाहत्यांना एक गुडन्यूज दिली आहे. दीपिका व रणवीर लवकरच आई-बाबा होणार आहेत. दीपिकाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही गुडन्यूज दिली आहे. दीपिकाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने 'सप्टेंबर २०२४' असे लिहिले आहे व खाली तिचे व रणवीरचे नाव लिहिले आहे. तसेच या पोस्टमध्ये लहान बाळाचे कपडे व खेळण्यांचे चित्रही रेखाटले आहे. दीपिकाची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. या गुडन्यूजनंतर चाहत्यांबरोबरच बॉलीवूडमधील अनेक मंडळी तिचे अभिनंदन करताना दिसत आहेत.'गोलियों की रासलीला राम-लीला' या चित्रपटापासून रणवीर व दीपिकाची लव्हस्टोरी सुरू झाली. या चित्रपटात दोघांनी पहिल्यांदा एकत्र काम केले होते. त्यानंतर दोघे 'बाजीराव-मस्तानी' आणि 'पद्मावत' या चित्रपटात एकत्र झळकले. सहा वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर रणवीर व दीपिकाने १४ नोव्हेंबर २०१८ रोजी लग्नगाठ बांधली. इटलीमध्ये दोघांच्या शाही लग्नसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. २०१५ मध्ये रणवीर आणि दीपिकाने गुपचूप साखरपुडाही केला होता.

# ट्रोल करणाऱ्यांवर जया बच्चन भडकल्या

अभिनेत्री जया बच्चन यांना त्यांच्या अभिनयाबरोबर रागीट स्वभावासाठीही ओळखले जाते. त्या सातत्याने चिडचिड करताना, पापाराझींवर भडकतानाचे व्हिडीओ व्हायरल होत असतात. त्यांचे फोटो घेणाऱ्या, त्यांच्याबरोबर फोटो काढू इच्छिणाऱ्या चाहत्यांना अनेकदा त्या फटकारताना दिसतात. दरम्यान, एका कार्यक्रमात जया बच्चन यांनी पुन्हा एकदा ट्रोल करणाऱ्यांवर निशाणा साधला आहे.अमिताभ व जया बच्चन यांच्याप्रमाणे त्यांची नात नव्या नवेली नंदाही नेहमीच चर्चेत असते. नव्याचा चाहतावर्गही मोठा आहे. नव्या अभिनय क्षेत्रापासून लांब असली तरी सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत ती चाहत्यांना अपडेट देत असते. आता नव्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. नुकताच तिचा पॉडकास्ट शो 'व्हॉट द हेल नव्या'चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमात नव्याची आजी म्हणजे अभिनेत्री जया बच्चन व आई श्वेता नंदा यांनी हजेरी लावली होती. दरम्यान, या कार्यक्रमामध्ये जया बच्चन यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक खुलासे केले आहेत. या पॉडकास्टमध्ये नव्याने जया बच्चन यांना विचारले, "सोशल मीडियावर नकारात्मक कमेंट्सवर लोकांच्या सर्वांत जास्त प्रतिक्रिया येतात. त्यावर तुमचं काय म्हणणं आहे?" या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, "जर तुम्हाला कमेंट करायची असेल, तर सकारात्मक करा.

# केतकी चितळे कोण आहे?

अॅट्रॉसिटी कायद्या विषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या अभिनेत्री केतकी चितळे (KETAKI CHITALE) आणि संयोजक बाजीराव धर्माधिकारी यांच्या विरोधात परळी शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. 5 फेब्रुवारी रोजी परळीत राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषद संपन्न झाली होती .या परिषदेत बोलताना केतकी चितळे हिने अॅट्रॉसिटी विषयी आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. परळीतील परळी शहर पोलीस तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन हा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर चार दिवसानंतर वंचित युवा बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष प्रेम जगतकर यांच्या फिर्यादीवरून ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संयोजक बाजीराव धर्माधिकारी आणि केतकी चितळेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांच्या विरोधात विरोधात कलम 295 (अ) तसेच कलम 505 (2) अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आलाय. केतकीच्या या वक्तव्यामुळे सध्या राज्यभरातून रोष व्यक्त केला जात असल्याचं पाहायला मिळतंय. त्यामुळे आता केतकीवर काय कारवाई केली जाईल हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. केतकी चितळे म्हणाली,"गेल्या पाच वर्षात किती अॅट्रोसिटी केस आहेत. त्यातल्या ब्राह्मणांच्या विरोधात किती आहेत आणि प्रत्येक जातीविरोधात किती आहेत हे शोधा. हे अख्ख रॅकेट आहे. ज्याबद्दल तुम्हाला कल्पनाही नाही. एक वकीलांनी गेल्या 15-20 वर्षात 62 अॅट्रॉसिटी केसेस टाकल्या आहेत.




# चित्रपटसृष्टीने अनेकदा अपमानित केले

चित्रपटसृष्टीतील अनेकांनी आपल्याला अपमानित केले, मात्र सूड उगवण्याचा आपला स्वभाव नाही. तसेच, आपल्याला अपमानित करणाऱ्यांविरुद्ध दावे दाखल करण्यापेक्षा आपला बचाव करण्यावर आपण लक्ष केंद्रित केले, असा दावा अभिनेत्री कंगना राणावत हिने अंधेरी येथील दंडाधिकारी न्यायालयात केला. अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूनंतर एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत खोटी विधाने केल्याच्या आरोपाप्रकरणी ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर यांनी कंगनाविरोधात मानहानीचा फौजदारी दावा दाखल केला आहे. याप्रकरणी, अंधेरी येथील दंडाधिकारी न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान कंगना हिने आपली बाजू मांडली. बाहेरचा माणूस म्हणून आपल्याला चित्रपटसृष्टीतील छळवणुकीला सामोरे जावे लागत असल्याचे सुशांत याने म्हटले होते. आपलीही चित्रपटसृष्टीकडून छळवणूक झाल्याची तक्रार मी केली होती. आपल्यालाही सिनेसृष्टीबाहेरील व्यक्ती म्हणून हिणवल्याचेही कंगनाने आपले म्हणणे मांडताना साक्ष न्यायालयाला सांगितले. चित्रपटसृष्टीतील या छळवणुकीला कंटाळून आत्महत्येचा विचार एका क्षणी आपल्याही मनात आला होता. त्यामुळे, सुशांत याच्या आत्महत्येची बातमी ऐकल्यानंतर खूप वाईट वाटल्याचेही कंगना हिने सांगितले.मुलाखतीत, अख्तर वगळता इतर कोणाबद्दलही आपण बोललो नाही. मुलाखतीत हेतुत: आपण त्यांच्या नावाचा उल्लेख केला होता. मुलाखतीमध्ये बोलण्यामागचा हेतू हा चित्रपटसृष्टीबाहेरच्या लोकांसमोरील आव्हाने सर्वसामान्यांसमोर आणण्याचा आपला उद्देश होता. आपण अभिनेता हृतिक रोशनची माफी मागण्यास नकार दिल्याने २०१६ च्या बैठकीत अख्तर हे आपल्याला ओरडले होते. अख्तर यांच्या वागण्यामुळे आपण नैराश्यात गेलो होतो. आपण या सगळ्या प्रकाराला घाबरल्यामुळेच आपल्याविरोधात तक्रार दाखल झाल्याचेही कंगना हिने सांगितले.अपमानित केले, मात्र सूड घेण्याचा आपला स्वभाव नाही आणि म्हणूनच अख्तर यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यास उशीर झाल्याचे कंगना हिने न्यायालयाला सांगितले.

# आलियाने सिद्धांत चतुर्वेदीला मेसेज केला

बॉलीवूड अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने 'गली बॉय' चित्रपटातून हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रदर्शित झालेल्या 'गहराइयां' चित्रपटामुळे सिद्धांत चर्चेत आला. बॉलीवूडमधील स्ट्रगल कोणालाच सुटत नाही, असं म्हणतात. सिद्धांतलाही बॉलीवूडमधील आव्हानांना सामोरं जावं लागलं होतं. या कठीण काळात सिद्धांतला काही कलाकारांकडून पाठिंबाही मिळाला होता. अलीकडेच याबाबत त्यानं खुलासा केला आहे.'हिंदुस्थान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत सिद्धांत म्हणाला, "मी इंडस्ट्रीमधील कोणत्याही व्यक्तीकडून अपेक्षा ठेवत नाही. चांगलं काम केल्यावर मिळत असलेल्या पाठिंब्याचं मी कौतुक करतो परंतु कठीण काळात इंडस्ट्रीमधलं कोणीही जवळ नसल्याची खंत मला वाटते."कलाकारांच्या पाठिंब्याबद्दल बोलताना, सिद्धांत म्हणाला, "विकी कौशल आणि रणबीर कपूरने मला खूप मदत केली आहे. रणबीर कपूर आणि मी फोनवर खूप वेळा बोललोसुद्धा आहे."पुढे सिद्धांत म्हणाला, "मी रणबीरला म्हणालो होतो, "मला माहीत नाही भाई; पण मी केलेलं काम चालतच नाही आहे." त्यावर रणबीर म्हणाला होता, "तू काम करत राहा. इतर लोक १०० गोष्टी करीत आहेत याचा विचार तू करू नकोस." आणि असाच रणबीर आहे. असं मला वाटतं. शंभर ठिकाणी नसूनही तो प्रसिद्ध आहे. 'गहराइयां' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर रणबीर आणि आलिया हे दोघंच असे होते: ज्यांनी मला मोठमोठे मेसेज केले होते.""रणबीर म्हणाला होता, "जेव्हा तू चित्रपट चालण्याची अपेक्षा सोडशील तेव्हा तुझा चित्रपट चालेल." 'खो गये हम कहां' हा चित्रपट फक्त नेमक्या प्रेक्षकांसाठी बनवला गेला होता. पण त्याला लोक एवढं प्रेम देतील, असं मला वाटलं नव्हतं", असंही सिद्धांतनं नमूद केलं. दरम्यान, सिद्धांतच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर २०२३ रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'खो गये हम कहां' चित्रपटात सिद्धांतबरोबर अनन्या पांडे आणि आदर्श गौरवनं मुख्य भूमिका केल्या होत्या. 'गली बॉय' चित्रपटामुळे सिद्धांत घराघरांत पोहोचला. सिद्धांतचा आगामी चित्रपट 'युद्धा' लवकरच प्रदर्शित होणार असून, त्यात मालविका मोहनम नायिकेच्या भूमिकेत दिसणार आहे.बॉलीवूड अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने 'गली बॉय' चित्रपटातून हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रदर्शित झालेल्या 'गहराइयां' चित्रपटामुळे सिद्धांत चर्चेत आला. बॉलीवूडमधील स्ट्रगल कोणालाच सुटत नाही, असं म्हणतात. सिद्धांतलाही बॉलीवूडमधील आव्हानांना सामोरं जावं लागलं होतं. या कठीण काळात सिद्धांतला काही कलाकारांकडून पाठिंबाही मिळाला होता.



# इरफान पठाण पांड्यावर भडकला!

## » तर भारतीय क्रिकेटला अपेक्षित परिणाम साधता येणार नाहीत

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने बुधवारी (28 फेब्रुवारी) खेळाडूंची वार्षिक करार यादी जाहीर केली. बीसीसीआयने एकूण 30 खेळाडूंचा करार यादीत समावेश केला आहे. A+ श्रेणीमध्ये चार खेळाडूंना, A मध्ये सहा, B श्रेणीमध्ये पाच आणि C श्रेणीमध्ये सर्वाधिक 15 खेळाडूंना स्थान मिळाले आहे. खेळाडूंसोबत हा करार ऑक्टोबर 2023 ते सप्टेंबर 2024 पर्यंतचा आहे.**



देशांतर्गत क्रिकेट न खेळल्यामुळे शिक्षा झाली आहे. माजी वेगवान गोलंदाज इरफान पठाणने ईशान किशन आणि श्रेयस अय्यरला वार्षिक करार न देण्याच्या बीसीसीआयच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला आहे.बीसीसीआयवर निशाणा साधत इरफान म्हणाला की हार्दिक पांड्यासारख्या खेळाडूंसाठी हे प्रमाण का नाही?बीसीसीआयने इशान आणि श्रेयसला दणका देतानाच 2018 पासून एकही कसोटी न खेळलेल्या पांड्याला ग्रेड-ए करार दिला आहे.इरफानने ट्विटरवर लिहिले की, 'इशान किशन आणि श्रेयस अय्यर प्रतिभावान क्रिकेटर आहेत आणि आशा आहे की ते जोरदार पुनरागमन करतील. हार्दिक सारख्या खेळाडूला लाल चेंडूचे क्रिकेट (कसोटी) खेळायचे नसेल तर त्याने आणि त्याच्यासारख्या खेळाडूंनी राष्ट्रीय कर्तव्यावर नसताना पांढऱ्या चेंडूच्या (वनडे) देशांतर्गत क्रिकेटमध्ये भाग का घेऊ नये? हे सर्वांना लागू होत नसेल, तर भारतीय क्रिकेटला अपेक्षित परिणाम साधता येणार नाहीत. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिका दौरा सोडल्यानंतर इशान किशन झारखंडकडून रणजी ट्रॉफी खेळण्यासाठी आला नव्हता. त्याने आयपीएलची तयारी सुरू केली, ज्यामध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे. बडोद्याविरुद्ध रणजी करंडक उपांत्यपूर्व फेरीत खेळण्यासाठी श्रेयस अय्यरही मुंबई संघात सामील झाला नाही. कंबरेच्या दुखापतीमुळे तो इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यानंतर भारतीय संघाबाहेर होता.इरफानने 2003 ते 2008 दरम्यान टीम इंडियासाठी 29 कसोटी सामन्यांमध्ये भाग घेतला होता. या काळात त्याने 31.57 च्या सरासरीने 1105 धावा करण्यासोबतच 100 विकेट्सही घेतल्या. आपल्या कसोटी कारकिर्दीत त्याने सात वेळा एका डावात पाच विकेट्स आणि एका सामन्यात दोन वेळा दहा बळी घेतले. याशिवाय इरफान पठाणने 120 एकदिवसीय आणि 24 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भाग घेतला. एकदिवसीय सामन्यात इरफान पठाणने पाच अर्धशतकांच्या मदतीने 1544 धावा केल्या आणि 173 बळी घेतले. T20 मध्ये 28 विकेट्स व्यतिरिक्त इरफान पठाणच्या नावावर एकूण 172 धावांची नोंद आहे. एवढेच नाही तर इरफान पठाणने जम्मू-काश्मीर संघाचे प्रशिक्षकपदही भूषवले आहे. इरफान पठाणने उमरान मलिक आणि अब्दुल समद यांसारख्या युवा खेळाडूंना सुधारण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. माजी वेगवान गोलंदाज इरफान पठाणने ईशान किशन आणि श्रेयस अय्यरला वार्षिक करार न देण्याच्या बीसीसीआयच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला आहे.इशान आणि श्रेयसला दणका देतानाच 2018 पासून एकही कसोटी न खेळलेल्या पांड्याला ग्रेड-ए करार दिला आहे. इरफानने ट्विटरवर लिहिले.

### आयपीएलची तयारी सुरू केली

» बीसीसीआयने इशान आणि श्रेयसला दणका देतानाच 2018 पासून एकही कसोटी न खेळलेल्या पांड्याला ग्रेड-ए करार दिला आहे. इरफानने ट्विटरवर लिहिले की, 'इशान किशन आणि श्रेयस अय्यर प्रतिभावान क्रिकेटर आहेत आणि आशा आहे की ते जोरदार पुनरागमन करतील. हार्दिक सारख्या खेळाडूला लाल चेंडूचे क्रिकेट (कसोटी) खेळायचे नसेल तर त्याने आणि त्याच्यासारख्या खेळाडूंनी राष्ट्रीय कर्तव्यावर नसताना पांढऱ्या चेंडूच्या (वनडे) देशांतर्गत क्रिकेटमध्ये भाग का घेऊ नये? हे सर्वांना लागू होत नसेल, तर भारतीय क्रिकेटला अपेक्षित परिणाम साधता येणार नाहीत. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिका दौरा सोडल्यानंतर इशान किशन झारखंडकडून रणजी ट्रॉफी खेळण्यासाठी आला नव्हता. त्याने आयपीएलची तयारी सुरू केली, ज्यामध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे. बडोद्याविरुद्ध रणजी करंडक उपांत्यपूर्व फेरीत खेळण्यासाठी श्रेयस अय्यरही मुंबई संघात सामील झाला नाही. कंबरेच्या दुखापतीमुळे तो इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यानंतर भारतीय संघाबाहेर होता.इरफानने 2003 ते 2008 दरम्यान टीम इंडियासाठी 29 कसोटी सामन्यांमध्ये भाग घेतला होता. या काळात त्याने 31.57 च्या सरासरीने 1105 धावा करण्यासोबतच 100 विकेट्सही घेतल्या.

# केएल राहुल पाचव्या कसोटीलाही मुकणार!

## » जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराहचं संघात पुनरागमन

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंडमध्ये चालू असलेल्या कसोटी मालिकेतील पाचवा सामना धर्मशाला येथे खेळवला जाणार आहे. टीम इंडियाचा मधल्या फळीतला भरवशाचा फलंदाज के. एल. राहुल दुखापतीतून सावरून या सामन्याद्वारे संघात पुनरागमन करेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र राहुल पाचव्या कसोटी सामन्यालाही मुकणार आहे. दरम्यान, टीम इंडियासाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराहचं संघात पुनरागमन झालं आहे.**




दरम्यान, वॉशिंग्टन सुंदरदेखील पाचव्या कसोटी सामन्यात टीम इंडियाचा भाग नसेल. रणजी सामना खेळण्यासाठी सुंदरला टीम इंडियातून मुक्त करण्यात आलं आहे. तमिळनाडूचा संघ रणजी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबईशी भिडणार आहे. वॉशिंग्टन सुंदर या सामन्यात तमिळनाडूचं प्रतिनिधीत्व करेल. दरम्यान, सुंदरच्या जागी दुसऱ्या कोणत्याही खेळाडूची संघात निवड करण्यात आलेली नाही.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने एक अधिकृत निवेदन जारी केलं आहे. यामध्ये म्हटलं आहे की, राहुल फिटनेस टेस्टमध्ये पास झाला असता तर त्याला संघात संधी दिली जाईल असं निवड समितीने आधी जाहीर केलं होतं. परंतु, राहुल अद्याप दुखापतीतून सावरलेला नाही. त्यामुळे त्याला पाचव्या कसोटीत विश्रांती दिली आहे. बीसीसीआयचं वैद्यकीय पथक राहुलच्या फिटनेसवर लक्ष ठेवून आहे. अधिक चांगल्या उपचारांसाठी राहुलला लंडनला पाठवण्यात आलं आहेच. बुमराहला चौथ्या कसोटीपूर्वी संघातून मुक्त करण्यात आलं होतं. परंतु, पाचव्या कसोटीसाठी तो उपलब्ध असणार आहे. त्यामुळे बुमराह धर्मशालाच्या मैदानावर खेळताना दिसेल. दुखापतग्रस्त मोहम्मद शमी अद्याप संघाबाहेर आहे.

### राहुलच्या फिटनेसवर लक्ष

» रणजी सामना खेळण्यासाठी सुंदरला टीम इंडियातून मुक्त करण्यात आलं आहे. तमिळनाडूचा संघ रणजी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबईशी भिडणार आहे. वॉशिंग्टन सुंदर या सामन्यात तमिळनाडूचं प्रतिनिधीत्व करेल. दरम्यान, सुंदरच्या जागी दुसऱ्या कोणत्याही खेळाडूची संघात निवड करण्यात आलेली नाही.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने एक अधिकृत निवेदन जारी केलं आहे. यामध्ये म्हटलं आहे की, राहुल फिटनेस टेस्टमध्ये पास झाला असता तर त्याला संघात संधी दिली जाईल असं निवड समितीने आधी जाहीर केलं होतं. परंतु, राहुल अद्याप दुखापतीतून सावरलेला नाही. त्यामुळे त्याला पाचव्या कसोटीत विश्रांती दिली आहे. बीसीसीआयचं वैद्यकीय पथक राहुलच्या फिटनेसवर लक्ष ठेवून आहे.